लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आज गोलमेज परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'कोल्हापूरचा शाश्वत विकास व पर्यावरणपूरक जीवनशैली' या विषयावर विचारमंथन व चर्चा होण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील गेस्ट हाऊस हॉलमध्ये आज, रविवारी (दि.१४) गोलमेज परिषदेचे आयोजन केले आहे. कोल्हापूरमधील सेतू व पुण्यातील पूर्णम इको व्हिजन संस्थेच्यावतीने आयोजित केलेल्या या परिषदेत जिल्ह्यातील पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या निरनिराळ्या संस्थांचे प्रतिनिधी, उद्योजक व स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते आज सकाळी ८ वाजता परिषदेचे उद्‍घाटन होणार आहे. पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.